लोकमत दि-५।१।२०१२

# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका)

## नियुक्ती

### मागासवर्गीय जागांचा अनुशेष भरण्यासाठी कनिष्ठ सुरक्षा रक्षक या पदाकरीता विशेष भरती मोहिम

अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (ड) विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय जातींच्या उमेदवारांकडून सुरक्षा रक्षक या पदांकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत :-

१) पद : कनिष्ठ सुरक्षा रक्षक

अनुशेष : अनुसूचित जमाती- ४९,
विमुक्त जाती (अ) - १४, भटक्या जमाती (ब)-१४,
भटक्या जमाती (ड)-४,
विशेष मागास प्रवर्ग - १४
इतर मागासवर्गीय जाती - १०८ (एकूण २०३ पदे)

२) आवश्यक अर्हता : उमेदवार सैनिक दलातून मुक्त करण्यात आलेले व त्यांना सशस्त्र सेवेतील किमान दोन वर्षांचा अनुभव असावा किंवा उमेदवारांना केंद्रिय औद्योगिक सुरक्षा दल किंवा केंद्रिय राखीव पोलिस दल किंवा सीमा सुरक्षा दल किंवा राज्य राखीव पोलिस दल किंवा सशस्त्र पोलिस दल तसेच राष्ट्रिय सुरक्षा गार्ड (NSG) सेवेतील दोन वर्षांचा अनुभव असावा.

<u>किंवा</u>

राष्ट्रिय छात्रसेना (एन.सी.सी) यामध्ये दोन वर्षांच्या अनुभवासह ए किंवा बी श्रेणीचे प्रमाणपत्र धारण करणारे नागरी व्यक्ती (civilian)
राष्ट्रिय छात्र सेना (एन.सी.सी.) उमेदवारांसाठी

<u>शारीरिक पात्रता :-</u>

१) उंची - १६२ से.मी. पेक्षा कमी नसावी.
२) वजन - ४५ कि.ग्रॅं. पेक्षा कमी नसावे.
३) छाती - ८० से.मी. पेक्षा कमी नसावी. (न फुगविता)

शारिरीक पात्रता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची ४० गुणांची शारिरीक चाचणी व ६० गुणांची मौखिक चाचणी घेण्यात येईल.

<u>शारिरीक चाचणी :-</u>

१) १०० मीटर धावणे.
२) १० पुल अप्स्.

३) शैक्षणिक अर्हता : इंग्रजी व मराठीचे ज्ञान अत्यावश्यक
राष्ट्रिय छात्र सेना (एन.सी.सी.) उमेदवारांसाठी १२ वी किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण,
नागरी व्यक्ती (civilian) साठी :
माध्यमिक शालांत (S.S.C.) वा तत्सम परीक्षा (मराठी विषय घेवून १००/५० उच्चतम किंवा निम्नतर परीक्षा) उत्तीर्ण असणे आवश्यक.

४) वयोमर्यादा : (०१.०१.२०१२ रोजी माजी सैनिकांसाठी १८ ते ४५ वर्षे/
राष्ट्रिय छात्र सेनेच्या (civilian) उमेदवारांसाठी १८ ते ३८ वर्षे)

५) वेतन व श्रेणी व भत्ते : सर्व वेतनेतर लाभांच्या अंतर्भावासह एकूण प्रारंभिक वेतन दरमहा अंदाजे रु. ७०००/- आहे. (वेतन श्रेणी रु. ७७५/- ते रु. २७७५/-) अन्य लाभ जसे भविष्य निर्वाह निधी/उपदान, मंजूर झाल्यास बोनस ऐवजी सानुग्रह अनुदान, रजेतील प्रवासात सहाय्य, रजेचे रोखीकरण, उपक्रमाच्या बसमधून मोफत प्रवासाच्या सुविधा आणि मोफत वैद्यकीय सुविधा, धुलाई भत्ता.

वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र इ. च्या समर्थनार्थ प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांच्या साक्षांकित छायामुद्रांकीत प्रती सोबत कोऱ्या कागदावर यथोचितरीत्या भरलेले अर्ज आणि मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम च्या नावे काढलेला रु. ३५/- (ना परतावा योग्य) रकमेचा डिमांड ड्राफ्ट व स्वतःचे नाव व पत्ता पिनकोड नंबरसह स्वच्छ हस्ताक्षरात लिहिलेला कोरा लिफाफा जोडून दिनांक २५.०१.२०१२ पूर्वी मुख्य कर्मचारीय अधिकारी, मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१ यांजकडे पोहचतील याची दक्षता घ्यावी.

अपूर्ण भरलेले/उशिरा आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**पीआरओ/सीपीओ/161/2012** **महाव्यवस्थापक**